Downloaded from SkillCouncils.com

# ग्रामपंचायत नेर ता. धुळे जि. धुळे

**ई-निविदा सूचना क्रमांक- GP/NER/06/2025-26**

मौजे नेर ता. धुळे येथे इतर १५ वा वित्त आयोग (ग्रामपंचायत स्तर ) अंतर्गत पुरुष व महिला स्वयंसहायता बचत गटांना व्यवसायिक प्रशिक्षण देणे या कामासाठी धुळे जिल्ह्यातील स्थानिक नोंदणीकृत संस्था /सेवा पुरवठादार यांच्याकडून दोन लिफाफा पध्दतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| **अ. क्र.** | **कामाचे नाव नाव** | **पात्रता** | **निविदा विक्रीरक्कम रु.** | **बयाना इसारा रक्कमरु.** |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे नेर ता. धुळे येथे इतर १५ वा वित्त आयोग (ग्रामपंचायत स्तर) अंतर्गत पुरुष व महिला स्वयंसहायता बचत गटांना व्यवसायिक प्रशिक्षण देणे – 50942243 (2021-22) | धुळे जिल्ह्यातील स्थानिक नोंदणीकृत संस्था/सेवा पुरवठादार | 300 | Nil |

वरील निविदा प्रक्रीया ई निविदा प्रकीयेद्वारे https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन करणेत येईल. तसेच निविदा सोबत सर्व सुचना, शुध्दीपत्रके इ. या https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर ऑनलाईन प्रसिध्द केले जातील. उपरोक्त नमुद प्रशिक्षण देणेसाठी धुळे जिल्ह्यातील स्थानिक नोंदणीकृत मान्यताप्राप्त संस्थांकडुन ई-निविदा मागविण्यांत येत असुन सोबत विहित नमुन्यातील ( BOQ ) व प्रस्तावासोबत अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

Dowmloaded from SkillCouncils.com

**अटी व शर्ती**

1) प्रशिक्षण देणारी संस्था नोंदणीकृत असावी

2) सदर प्रशिक्षणासाठी लाभार्थी हे ग्रामपंचायततील असल्याने निविदाधारक संस्थांनी संबधित ग्रामपंचायतीचे ठिकाणी ग्रामपंचायतीतील व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणार्थ्यांची शैक्षणिक पात्रता किमान : HSC / SSC

3) सदर व्यावसायिक प्रशिक्षण व प्रशिक्षणाची परिक्षा फी सहित एकुण प्रशिक्षण शुल्क व कालावधी (BOQ) मध्ये नमुद करावा. तसेच प्रशिक्षणाचे दर नमुद करतांना प्रति लाभार्थी दर नमुद करणे आवश्यक आहे. असे न केलेल्या निविदा फेटाळण्यांत येतील.

4) प्रशिक्षण कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लगेच प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन प्रशिक्षण सुरु करावे लागेल.

5) प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण पुर्ण केल्याबाबत दाखला, निकाल प्रत सादर करणे आवश्यक आहे.

6) प्रशिक्षण संस्था निवडीचा आदेश निर्गमित झाल्यानंतर 8 दिवसांचे आंत आदेशातील अटी व शर्ती नुसार प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी बाबत विहित मुद्रांक शुल्काच्या रक्कम रु.१००/- स्टॅम्प पेपरवर संस्थेने स्वखर्चाने करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

7) प्रशिक्षणासाठी ग्रामपंचायततील मंजुर पात्र लाभार्थ्यांना निमंत्रित करण्याची व प्रशिक्षण पुर्ण करण्याची जबाबदरी संस्थेची राहील. याबाबत संस्था सरपंच /ग्रामविकास अधिकारी यांचे सहकार्य घेईल.

8) प्रशिक्षणार्थी यांनी सदरचे नमुद प्रशिक्षण कोर्स पुर्ण करणे बंधनकारक राहील.

9) जी छायांकित कागदपत्र अर्जासोबत सादर करण्यांत येतील ती सर्व कागदपत्रे सांक्षाकित असणे बंधनकारक आहे.

Downloaded from SkillCouncils.com

10) संस्था किमान 1 वर्षापासुन नोंदणीकृत असावी व प्रस्तावित प्रशिक्षण राबविण्याचा सदर संस्थेस प्रशिक्षण देण्याचा अनुभव असावा. याकरिता मागील वर्षाचे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी निविदेत अपलोड करावी.

11) संस्थेकडे असलेल्या प्रशिक्षीत मनुष्यबळ यादी व उपलब्ध यंत्रसामुग्रीची यादी संस्थेच्या अपलोड करावी.

12) प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर संबंधित सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र संबधीत प्रशिक्षणार्थ्यास देणे अनिवार्य आहे.

13) संमतीपत्रातील सर्व अटी व शर्तींचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील. त्यातील कोणत्याही अटी व शर्तींचा भंग झाल्यांस अथवा संस्थेची मान्यता रद्द झाल्यास अथवा संस्थेने प्रशिक्षण अपुर्ण सोडल्यांस संस्था काळ्या यादीत टाकण्याबाबतची कारवाईस पात्र राहील.

14) प्रशिक्षणार्थ्यांची सुरक्षिततेची व संरक्षणाची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थेची राहील.

15) निवड झालेल्या संस्थेस योजना राबविण्यासाठी आदेश निर्गमित केल्यानंतर संस्थेने प्रशिक्षणाचा संपुर्ण कालावधी यशस्वीरित्या पुर्ण करणे बंधनकारक राहील.

16) योजना राबवितांना काही अपरिहार्य कारणास्तव तांत्रिक अडचणीमुळे अथवा अन्य कारणामुळे प्रशिक्षणाचे देय रक्कमेच्या अदायगीस विलंब झाल्यांस त्यावर कुठल्याही प्रकारे व्याज/ विलंब आकार संबधीत संस्था मागणी करणार नाही. तसेच याबाबत न्यायालयाकडेस दाद मागता येणार नाही.

17) प्रशिक्षणाचा निधी उपलब्धते नुसार देण्यांत येईल व उपरोक्त सर्व अटी व शर्ती निविदाधारकांस बंधनकारक आहेत. तथापि त्या संस्थेच्या निविदेचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

18) निविदा फी ही धनाकर्षाने (डी.डी.) स्विकारली जाईल. सदर बँकेचा धनाकर्ष हा सरपंच /ग्रामसेवक ग्रामपंचायत नेर यांचे नावे पाहीजे. व त्यांची स्कॅन कॉपी लिफाफा क्रमांक ०१ मध्ये अपलोड करावी. व मुळ धनाकर्ष व लिफाफा क्रमांक १

Downloaded from SkillCouncils.com

चे संपुर्ण कागदपत्रे कार्यालयीन वेळेत व निविदा विक्रीनंतर निविदा उघडण्याचे वेळेपूर्वी ग्रामपंचायत कार्यालयात आणुन दयावेत. मुळ धनाकर्ष वलिफाफा क्रमांक चे संपुर्ण कागदपत्रे आणुन न दिल्यास आपली निविदा रदद करणेत येईल.

19) एकच अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता अंशतः / संपुर्ण नाकारणेचा अधिकार सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत नेर यांनी राखुन ठेवला आहे.

20). निविदे सोबत जोडलेल्या कागदपत्रांचे आवश्यकता भासल्यास सादरीकरण करणे बंधनकारक राहील.

21) लिफाफा क्र९ मध्ये स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

1. Tender related fees DD Scan copy/(MSME) And Processing Fees Payment Receipt
2. Scan copy of valid Registration Certificate
3. Pan card
4. Income tax certificate (If Applicable)
5. GST Registration (If Applicable)

22) लिफाफा क्रमांक २ मध्ये स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे.

1. BOQ.xls file from tenders works documents.

23) सदर ई निविदेच्या Critical Dates संकेत स्थळावरील तपशिलप्रमाणे राहील.

24) प्रशिक्षणबाबतचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

25) धुळे जिल्ह्याबाहेरील संस्थाना निविदाप्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

**सरपंच /ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत नेर ,**
**ता.आणि जि .धुळे**

Signature Not Verified
Digitally signed by GAYTRIDEVI SANJAY JAYSWAL
Date: 2025.04.21 17:41:00 IST
Location: Maharashtra-MH